# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शनिवार, दिनांक १७ डिसेंबर, २०१६
## (सकाळी १०.०० वाजता)

एक : **अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २३३ ते २५९ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

दोन : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **परिवहन मंत्री** : कोकण रेल्वे महामंडळ यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल लेखा अहवालासह सभागृहासमोर ठेवतील.

(२) **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची** सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत योजनांसाठी वैधानिक विकास मंडळनिहाय नियतव्यय व खर्चाची योजनानिहाय सुधारित माहिती सभागृहासमोर ठेवतील.

तीन : **अनुसूचित जाती कल्याण समितीचा सहावा अहवाल सादर करणे.**

चार : **विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती.**

पाच : **स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

सहा : **औचित्याचे मुद्दे.**

सात : **(अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. शिरीष चौधरी, नरेंद्र पवार, उदेसिंग पाडवी, संजय पुराम, राजेंद्र नजरधने, रामचंद्र अवसरे, बाळासाहेब मुरकुटे, श्रीमती संगीता ठोंबरे, डॉ भारती लव्हेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, सुरेश**

**लाड, हनुमंत डोळस, पांडुरंग बरोरा, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अमळनेर (जि.जळगांव) येथे दिनांक २७ नोव्हेंबर, २०१६ रोजी नगरपरिषदेच्या निवडणूकीच्या मतदानाच्या दिवशी माजी लोकप्रतिनिधी तसेच त्यांच्या साथीदारांनी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार तसेच त्यांच्या कुटुंबियांवर केलेला जीवघेणा हल्ला, सदर लोकप्रतिनिधीचे कार्यालय, घर तसेच कार्यकर्त्यांच्या वाहनांची तोडफोड करुन त्यांना आग लावण्याची घडलेली घटना, राजकीय कारणासाठी माजी आमदार तसेच त्यांच्या गुंड सहकाऱ्यांनी शहरात निर्माण केलेले दहशतीचे वातावरण व दंगल भडकविण्याचा केलेला प्रयत्न, मतदारांना जीवे मारण्याची, जाळपोळ करण्याची धमकी देऊन मतदानापासुन वंचित ठेऊन मतदान प्रक्रिया बंद करण्याचा करण्यात आलेला प्रयत्न, तथापि, त्यांच्या विरुध्द  पोलिसांनी कोणतीही कारवाई न करणे, या प्रकारामुळे स्थानिक जनतेमध्ये पोलिस प्रशासन तसेच शासनाविरुध्द निर्माण झालेला असंतोष, शासनाने तातडीने दखल घेऊन येथील निवडणुक रद्द करण्याची तसेच दोषींविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री.सुनिल प्रभु, प्रशांत ठाकूर, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विजय काळे, समीर कुणावार, अतुल भातखळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, अमर काळे, सुनिल केदार, अमीन पटेल, अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, राणाजगजीतसिंह पाटील, हसन मुश्रीफ, किसन  कथोरे, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, नरहरी झिरवाळ, रुपेश म्हात्रे, सुनिल शिंदे, ॲड. भिमराव धोंडे, श्रीमती. सिमा हिरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नवी मुंबई खारघर सेक्टर १० मधील, 'पुर्वा डे-केअर प्ले स्कुल' या पाळणाघरात मुलांशी निगा राखण्यासाठी ठेवलेल्या अफसाना शेख या आयाने १० महिन्यांच्या बाळाला अमानुषपणे मारहाण केल्याचे दिनांक २१.११.२०१६ रोजी उघडकीस येणे, आई-वडील दोघेही नोकरी करीत असल्यामुळे सदर बाळाला पाळणाघरात ठेवण्यात येत असणे, सदर प्रकरण सीसीटिव्हीद्वारे निर्दशनास आल्यावर बाळाच्या आईने दिनांक २३.११.२०१६  रोजी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करुनही पोलीसांनी आरोपी विरुद्ध कारवाई न करणे, पिडीत बाळास उपचारासाठी नवी मुंबईतील हिरानंदानी, फोर्टीस रुग्णालयात दाखल केले असता फ्रॅक्चर असल्याचे आढळून येणे, सदर

पाळणाघरात इतर बाळांबरोबर देखील असाच प्रकार होण्याची शक्यता असणे, यामुळे पाळणाघरांमध्ये मुलांच्या संगोपणाबाबत निर्माण झालेली अविश्वासाची भावना, परिणामी मुलांना पाळणाघरात ठेऊन नोकरी करणाऱ्या पालकांमध्ये निर्माण झालेली चिंता, राज्यातील सर्व पाळणाघरांमध्ये बाळांची निगा, संगोपन व सुरक्षा उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य शासनाने प्ले स्कुलबाबत धोरण बनवून त्याची त्वरीत अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, पाळणाघरांची नोंदणी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **डॉ. मिलिंद माने, सर्वश्री. चरण वाघमारे, अतुल भातखळकर, ॲड. आशिष शेलार, डॉ. अनिल बोंडे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, पांडुरंग बरोरा, सुरेश लाड, भास्कर जाधव, श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"विदर्भामध्ये महिला व पुरुषाचे गट बनवून माइक्रो फायनान्स कंपन्यानी विनातारण दिलेले कर्ज, या मधील काही कंपन्यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची परवानगी असल्याचे भासविणे, कर्जाचा २४ ते ३० टक्के असलेला व्याजदर, कर्ज वसुली करतांना तासनतास महिलांना बसवुन ठेवणे, त्यांच्यावर मानसिक दबाव आणणे, कर्ज वसुलीकरीता धमक्या देणे, गुंडांद्वारे वसुलीकरीता धाक निर्माण करणे, जादा व्याजदरामुळे महिलांचे व पुरुषांचे होणारे आर्थिक शोषण, कर्ज वसुली न झाल्यास महिलांच्या घरातील वस्तुचा लिलाव करणे, त्यामुळे महिलांमध्ये भिती व असुरक्षिततेची भावना असणे, व्याजदर १० टक्के पेक्षा कमी व माइक्रो फायनान्सचे कर्ज बँकाकडे वर्ग करण्याची महिलांची मागणी असणे, थकीत राहीलेले कर्ज माफ करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्ह्यातील 'ब' वर्ग ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंर्तगत श्री क्षेत्र खंडेश्वर संस्थान (ता. नांदगाव खंडेश्वर) आराखड्यातील मंजुर परंतू प्रलंबीत कामे तातडीने पूर्ण करणे व उर्वरीत निधीची मागणी करणेबाबत स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अमरावती व कार्यकारी अभियंता, जि. प. बांधकाम विभाग, अमरावती याना लेखी कळविणे, या १३ व्या शतकातील हेमाडपंथी मंदीर

ठिकाणाच्या रुपये १२२५.०० लक्ष किंमतीच्या विकास आराखड्याला शासनाने दिलेली मंजुरी, परंतू विहीत मुदतीत कामे पुर्ण करण्यात येत नसल्याने रखडलेली कामे, शासनामार्फत उपलब्ध निधीची कामे पूर्ण करुन निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करुन उर्वरीत निधीची मागणी करणेबाबत निर्देशीत केलेले असणे, परंतू अद्यापही मंजुर कामे पूर्ण करण्यात न येणे, यामुळे लाखो भाविकांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे तातडीने विकास आराखड्याअंर्तगत कामे पूर्ण करण्याची व उर्वरीत निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-**

(या लक्षवेधी सूचनांची सूची जोडपत्राद्वारे वेगळी वितरीत करण्यात येईल.)

**आठ : शासकीय विधेयके :**

**(अ) विधानपरिषदेने संमत केलेले सन २०१६ चे वि. प. वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१६ यात विधानसभेने केलेल्या सुधारणांना विधानपरिषदेने दिलेल्या सहमतीचा संदेश.**

---

**(ब) पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ – महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांची वेतने व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०१६.

(२) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६.

---

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ – महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांची वेतने व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०१६.**

---

**(२) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६.**

---

**(३)** (क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ – डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५३ – डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५३ – डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५३ – डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या ११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(शुक्रवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

नऊ : **सर्वश्री. जयंत पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, गणपतराव देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, शशिकांत शिंदे, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब थोरात, जितेंद्र आव्हाड, प्रा. वीरेंद्र जगताप, सर्वश्री. भास्कर जाधव, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री अब्दुल सत्तार, राणा जगजितसिंह पाटील, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री दिलीप सोपल, अमिन पटेल, बबनराव शिंदे, सुनिल केदार, राहुल मोटे, मो.आरिफ नसीम खान, हसन मुश्रीफ, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. दत्तात्रय भरणे, धनाजी अहिरे, बाळासाहेब पाटील, डी.पी.सावंत, संग्राम जगताप, मधुकरराव चव्हाण, राजेश टोपे, कालीदास कोळंबकर, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. वसंतराव चव्हाण, हनुमंत डोळस, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री. विजय भांबळे, कुणाल पाटील, वैभव पिचड, काशिराम पावरा, संजय कदम, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, सुभाष ऊर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री.शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :-**

"विदर्भ व मराठवाडयातील शेतमालाची अत्यल्प भावात होणारी विक्री,डाळवर्गीय वस्तुंची मोठया प्रमाणात आयात केल्यामुळे तसेच नोटबंदीमुळे शेतकऱ्याच्या सोयाबीन, कापूस, मूग, उडीद व तूर पिकाला मिळणारे अत्यल्प दर, याप्रकरणी शासनाने कोणतीही उपाययोजना न करणे, परिणामी शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक व त्याला शासनाकडून मिळणारे अभय, आरोग्य विभागातील डॉक्टर व पॅरामेडीकल स्टाफच्या अपुऱ्या संख्येमुळे आरोग्य व्यवस्थेचा उडालेला बोजवारा, कार्यरत डॉक्टरांना दुर्गम व ग्रामीण भागात राहण्याच्या सुविधा नसणे, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना निधीअभावी बंद पडणे, परिणामी आदिवासी भागातील बाल मृत्यु व मातामृत्युचे वाढते प्रमाण, गेल्या वर्षभरात राज्यात १८ हजार बालकांचा केवळ कुपोषणामुळे मृत्यु झाल्याचे शासनाने मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणणे, आयुर्वेदिक डॉक्टरांच्या समस्यांकडे होणारे दुर्लक्ष, कुष्ठरोग्यांचे वाढते प्रमाण, तोतया डॉक्टरांचा सुळसुळाट, अवयवदानातील घोटाळे, रुग्णालयांची अस्वच्छता, खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्ण हक्कांचे

होणारे उल्लंघन, नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाच्या निर्मितीसाठी शेतकऱ्यांचा जमिनी देण्यास होत असलेला प्रचंड विरोध, शेतकरी जमिनी देण्यासाठी तयार नसताना जिल्हाधिकारी, प्रांत, तहसीलदार यांनी शेतक-यांना खोटी आश्वासने देऊन दिशाभूल करणे, अस्तित्वात असणारा नागपूर-जालना-औरंगाबाद-सिन्नर-घोटी-मुंबई महामार्गाचे चौपदरीकरण केल्यास वाहतूकीची चांगली व्यवस्था निर्माण होऊ शकणे, मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्ती घोटाळयाची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या विशेष कृती दलाने दिनांक २९ ऑगस्ट,२०१६ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी न करणे, अपंगांना प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने आदेश देऊनही सामाजिक न्याय विभागाकडून आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना सहकार्य न मिळणे, अनुसूचित जाती तसेच दलित वस्ती सुधारणेसाठी योजना आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार निधी खर्च न होणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(शुक्रवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**दहा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, अजित पवार, गणपतराव देशमुख, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, डॉ पंतगराव कदम, सर्वश्री.बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, जयदत्त क्षीरसागर, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री. अब्दुल सत्तार, अबु आझमी, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री अमीन पटेल, भास्कर जाधव, सुनिल केदार, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. नसिम खान, राणाजगजितसिंह पाटील, दिलीप सोपल, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. बबनराव शिंदे, धनाजी अहिरे, राहुल मोटे, डी.पी. सावंत, हसन मुश्रीफ, मधुकरराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, कालीदास कोळंबकर, दत्तात्रय भरणे, बसवराज पाटील, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम जगताप, राजेश टोपे, श्रीमती. दिपीका चव्हाण, सर्वश्री. कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशीराम पावरा, अवधुत तटकरे, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री. शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्रंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यास शासनास आलेले अपयश, डिजिटल युगात ऑनलाईन फसवणुकीच्या वाढत्या प्रकारामुळे सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवर होणारे अत्याचार, रेल्वेतील वाढत्या गुन्हेगारीमुळे प्रवाशांमध्ये निर्माण झालेली असुरक्षितता, ज्येष्ठ नागरिकांवरील वाढते अत्याचार, मुंबईत वास्तव्य करीत असलेल्या परकीय नागरिकांमार्फत मोठ्या प्रमाणात होत असलेली अमली पदार्थांची तस्करी, अवैध दारु, मटका, जुगार यांचे वाढते प्रमाण, पोलीस दलातील १३ हजार पदे रिक्त असल्याने कामाचा वाढता ताण, पोलिसांवर होणारे हल्ले, त्यात मुंबईच्या वाहतूक पोलिसांचा झालेला मृत्यू, कल्याण येथे पोलीस अधिकाऱ्याला पाण्यात बुडवून मारण्याचा झालेला प्रयत्न, परिणामी देशात घडणाऱ्या IPC अंतर्गत दाखल होणाऱ्या दखलपात्र एकूण गुन्ह्यात महाराष्ट्र राज्य आघाडीवर असणे, पोलिसांची निवासस्थाने व विविध ठिकाणच्या पोलीस ठाण्याची झालेली दयनीय अवस्था, मुंबईतील वाढती गुन्हेगारी, लैंगिक छळ व अपहरणाचे वाढते प्रमाण, सागरी व अंतर्गत सुरक्षेच्या उपाययोजना करण्याबाबत शासनाची उदासीनता, तीन वर्षानंतरही डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येचा तपास पूर्ण न होणे, तसेच समीर गायकवाड व विरेंद्र तावडे यांच्यासंदर्भात ठोस पुरावे असूनही सनातन संस्थेवरील बंदीबाबत कोणतीही कार्यवाही न करणे, अवैध प्रवासी वाहतूक टॅक्सी व रिक्षा चालकांची दादागिरी, ओला-उबेरला लोकांची असलेली मागणी, वाहन चाचणीसाठी ट्रॅक उभारणीस होणारा विलंब, राज्यातील २३ लाख वाहने फिटनेस प्रमाणपत्राअभावी बंद असणे, दलितांवरील अत्याचारात झालेली वाढ, दुर्बलांवरील हल्ले रोखण्याची गरज असल्याचे मा.राष्ट्रपतींनी केलेले आवाहन, रेल्वे होमगार्डच्या बनावट हजेरीतील मोठा घोटाळा उघडकीस येऊनही कोणतीही कारवाई न होणे, राज्यातील तुरुंगात मर्यादेपेक्षा अधिक ठेवण्यात आलेले कैदी, तुरुंगातील गैरप्रकारांना आळा घालण्यात आलेले अपयश, तुरुंगात निकृष्ट माल पुरविणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यास होणारा विलंब, पलायन केलेले कैदी अद्याप न मिळणे, वाढत्या वाहनांमुळे वाहतुकीची निर्माण झालेली समस्या, परिवहन महामंडळाचा वाढता तोटा, उत्पादन शुल्क विभागातील रिक्त पदांमुळे शासनाचा बुडत असलेला महसूल, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## " राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १६ डिसेंबर, २०१६

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.